**ठळक बातम्या**

- कर्नाटकातल्या कंत्राट आरक्षणासंदर्भात संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ
- डाव्या अतिरेकीवादाने प्रभावित झालेल्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचं काम आता अंतिम टप्प्यात पोहोचलं असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याची शिफारस करण्याचा ठराव महाराष्ट्र विधानसभेत एकमताने मंजूर
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात आक्षेपार्ह टिप्पणीप्रकरणी कामराविरुद्ध एफ आय आर दाखल

**आणि**

- आयपीएल क्रिकेट मधे आज दिल्ली कॅपिटल्स संघाचा सामना लखनौ सुपर जायंट्स बरोबर होणार

**<><><><><>**

कर्नाटकात सरकारी कंत्राटांमधे मुस्लिमांसाठी आरक्षण ठेवल्याच्या निषेधात भाजपा सदस्यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ केला. राज्यसभेत कामकाज सुरु होताच सत्ताधारी भाजपा सदस्यांनी या मुद्द्यावरून घोषणा द्यायला सुरुवात केली. या आरक्षणासंदर्भात संविधानात बदल करण्याविषयी कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी केलेल्या टिप्पणीचा मुद्दा संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी उपस्थित केला. एका विशिष्ट अल्पसंख्य समाजासाठी संविधानातल्या तरतुदी बदलण्याची भाषा करुन काँग्रेसने संविधानाचा अपमान केला असल्याचा आरोप त्यांनी केला, तसंच डी के शिवकुमार यांच्या राजीनाम्याची

मागणी केली. सभागृह नेते जगतप्रकाश नड्डा यांनीही काँग्रेस संविधानाचं महत्त्व कमी करत असल्याचा आरोप केला. विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यावर सांगितलं की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेली राज्यघटना कोणीही बदलू शकत नाही, आणि आरक्षण पद्धतीही कोणी संपवू शकत नाही. भाजपा संविधानाला कमी लेखत असल्याचा आरोप त्यांनी केला. आरोप प्रत्यारोप तसंच घोषणा – प्रतिघोषणा चालूच राहिल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं.

लोकसभेतही सत्ताधारी भाजपाच्या सदस्यांनी याच मुद्द्यावरुन जोरजोराने घोषणा दिल्या. उत्तर प्रदेशात महिलांवर अत्याचाराविरोधातल्या घोषणा लिहीलेले फलक घेऊन समाजवादी पार्टीच्या काही सदस्यांनी सभागृहात प्रवेश केला. सभापती ओम बिरला यांनी त्याला हरकत घेतली. सदस्यांनी सभागृहाच्या नियमांचं आणि सभ्यतेच्या संकेतांचं पालन करावं असं त्यांनी सांगितलं. मात्र सपा सदस्यांनी घोषणा चालूच ठेवल्या. दरम्यान भाजपाचे खासदारही घोषणा देत होते. गदारोळामुळे सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास रद्द केला आणि कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. नंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी कर्नाटकातल्या आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. संविधान बदलण्याची भाषा करणारे डी के शिवकुमार यांना काँग्रेसने सर्व संवैधानिक पदांवरुन तात्काळ हटवावं अशी मागणी त्यांनी केली. भाजपा सदस्यांच्या घोषणा चालूच राहिल्यानं सभापती ओम बिरला यांनी दोन वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं.

**<><><><><>**

डाव्या अतिरेकीवादाने प्रभावित झालेल्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचं काम आता अंतिम टप्प्यात पोहोचलं असून लवकरच छत्तीसगड हे राज्य नक्षलवादातून मुक्त होईल, असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला. त्या आज रायपूर इथे छत्तीसगढ विधानसभेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित

कार्यक्रमात बोलत होत्या. ९० सदस्यांच्या या विधानसभेत १९ महिला आमदार असून २०२३मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त होती, याचं कौतुक राष्ट्रपतींनी यावेळी केलं.

<><><><><>

आज जागतिक क्षयरोग विरोधी दिन. क्षयरोग निर्मूलनासाठी देशातल्या जनतेने एकजुटीने लढा देण्याचं आवाहन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी केलं आहे. आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात ते म्हणाले की, सरकाने क्षयरोगाच्या निर्मूलनासाठी अनेक पावलं उचलली आहेत. राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, १०० दिवसांचं अभियान आणि निक्षय पोषण योजनेंतर्गत क्षयरोग ग्रस्तांना मिळणारी आर्थिक मदत दरमहा ५०० रुपयांवरून १ हजार रुपये करण्यात आली आहे, असं नड्डा म्हणाले. क्षयरोग ग्रस्तांना मदत करणाऱ्या सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे नड्डा यांनी या संदेशाद्वारे आभार मानले.

<><><><><>

दिल्ली उच्च न्यायालयानं आज न्यायमूर्ती यशंवत वर्मा यांच्या निवासस्थानी लागलेल्या आगीत मोठ्या प्रमाणात आढळलेल्या रोख रक्कम प्रकरणी त्यांच्यांवर कारवाई करून त्यांचं न्यायालयीन कामकाज काढून घेतलं आहे. ही माहिती उच्च न्यायालयाच्या संकेत स्थळावर देण्यात आली आहे.

<><><><><>

कॅनडामध्ये येत्या २८ एप्रिल रोजी निवडणुका होणार असल्याची घोषणा प्रधानमंत्री मार्क कार्नी यांनी केली आहे. यासाठी त्यांनी रविवारी गव्हर्नर जनरल मेरी सायमन यांची भेट घेऊन संसद विसर्जित करण्याची विनंती केली होती. ती सायमन यांनी मान्य केली आहे. त्यामुळं या आगामी निवडणुकांमध्ये कार्नी यांचा सामना कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे नेते पियरे पॉइलीव्हरे यांच्याशी होणार आहे.

<><><><><>

क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याची शिफारस केंद्रशासनाकडे करण्याचा ठराव आज महाराष्ट्र विधानसभेत एकमताने मंजूर झाला. राज शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी मांडलेला हा ठराव एकमताने मंजूर झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करणारा ठरावही आज विधानसभेत मंजूर झाला.

**<><><><><>**

कुणाल कामरा विरोधात कठोरात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिलं. संविधानाने प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलं असलं तरी यातून दुसऱ्याला अपमानित करण्याचा अधिकार कोणालाही नाही. अशा गोष्टी सहन करणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी हा मुद्दा उपस्थित केला आणि कुणाल कामरा याच्या अटकेची मागणी केली.

यानंतर सत्ताधारी सदस्यांनी अध्यक्ष समोरच्या जागेत येऊन घोषणाबाजी केली. त्यामुळे अध्यक्षांनी सभागृहाचे कामकाज ५ मिनिट साठी तहकूब केलं. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष पदाची निवडणूक २६ मार्च रोजी होणार असल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत केली. यासाठी उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत विधानसभा सचिवांकडे अर्ज जमा करता येतील, असं त्यांनी सांगितले. २६ मार्चला सकाळी ११ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल कथितरीत्या अपमानजनक टिप्पणी केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्याविरोधात एफआयआर दाखल केला आहे. तसंच या कार्यक्रमाचं चित्रीकरण ज्या स्टुडिओत झालं, त्या स्टुडिओची आणि हा स्टुडिओ असलेल्या हॉटेलची तोडफोड करणाऱ्या ४० शिवसेना कार्यकर्त्यांविरुद्धही पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली आहे. दरम्यान, कुणाल कामरानं माफी मागावी, नाहीतर त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानभवन परिसरात दिला. राज्यघटनेनं अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला असला, तरी त्याचा स्वैराचार होता कामा नये. अशा प्रकारे कुणाचाही अपमान सहन करणार नाही, असं ते म्हणाले. या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये नव्या शाब्दिक वादाला तोंड फुटलं आहे.

**<><><><><>**

औरंगजेब कबरीचा मुद्दा काढण्याची गरज नाही. तसंच कोणीही बोलतांना विचार करून बोलले पाहिजे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. विनाकारण पोलिसांवर किंवा कायदा- सुव्यवस्थेवर ताण येईल असं कोणीही बोलू नये, असं त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<><><><><>**

नागपूर हिंसाचार प्रकरणातला प्रमुख आरोपी फहीम खान याचं दुमजली घर पाडण्यात आलं आहे. काही दिवसांपूर्वी नागपूर महानगरपालिकेने खान याच्या घराचा इमारत आराखडा मंजूर नसल्यामुळे त्याचं घर अनधिकृत असल्याच्या कारणामुळे नोटीस बजावली होती. आज सकाळी पालिकेने खानच्या घरावर कारवाई केली. या संपूर्ण परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. १७ मार्च रोजी औरंगजेबाच्या कबरीसंदर्भात पसरलेल्या अफवेमुळे हिंसाचार

झाला होता. या हिंसाचारात १०० हून जास्त जणांना अटक करण्यात आली असून फहीम हा या प्रकरणाचा मुख्य आरोपी आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स संघाचा सामना लखनौ सुपर जायंट्स बरोबर होणार आहे. विशाखापट्टणम इथल्या डॉ राजशेखर रेड्डी क्रिकेट स्टेडियममध्ये हा सामना आज सायंकाळी साडेसात वाजता सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज संघाने मुंबई इंडियन संघाचा पराभव केला, तर हैद्राबाद इथं झालेल्या सामन्यात सन रायझर्स हैद्राबाद संघाने राजस्थान रॉयल्स चा पराभव केला होता.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं आज आंध्र प्रदेशच्या किनारी भागांमध्ये, यानम, तेलंगणा आणि कर्नाटकच्या अंतर्गत परिसरामध्ये ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटांसह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवला आहे. जम्मू आणि काश्मीर, लडाख आणि हिमाचल प्रदेशातही वादळ आणि विजांचा कडकडाट होणार आहे.

**//<><><><><>//**